# प्रकरण चौथे

# साम्य व भेद

# प्रकरण चौथे

## साम्य व भेद (तुलना) :-

तुलना करणे हा मानवाचा सहजधर्म आहे. मानवी व्यवहारात तुलना तत्त्व अनादिकालापासून अतिशय महत्त्वाचे ठरलेले आहे. एक गोष्ट दुसऱ्यापेक्षा कितपत सरस किंवा निरस आहे हे त्या गोष्टीचे श्रेष्ठत्व आणि कनिष्ठत्व ठरविण्याचे कार्य तुलनेशिवाय अशक्य आहे. तुलना मग ती कोणत्याही क्षेत्रातील असो. आपल्या दैनंदिन जीवनात आपली आवड नावड आपण ठरवित असतो. कधी उघडपणे तर कधी मनातल्या मनात एकापरीने तुलनाच करीत असतो. त्यातील डावी उजवी पाहून आपण बरी गोष्ट स्वीकारतो. साहित्याच्या क्षेत्रात तुलना अपरिहार्य ठरते. एखादी कलाकृती कोणत्या बाबतीत चांगली आहे हे स्पष्ट करण्याची जबाबदारी समीक्षकाला पार पाडता येणे शक्य नाही. एकाच प्रकारात अंतर्भूत झालेल्या इतर कलाकृतींशी तुलना करून समीक्षकाला निर्णय देता येतो.

तुलनेच्या आधारे केलेल्या साहित्याचा अभ्यास म्हणजे तौलनिक अभ्यास असे ढोबळमानाने म्हटले जाते. साहित्य विचारात तुलनेशिवाय पानही हलणार नाही. साहित्यकृतींच्या तुलनेतून आपण आपल्या मनात साहित्याविषयीचे तारतम्य निर्माण करतो. या मनोव्यापाराला मूल्यकल्पनेची फळे येतात. मूल्यकल्पनेच्या निकषावर नवनव्या साहित्यकृती आपण पारखून घेतो.

जी कलाकृती उत्कृष्ट आहे अशी आपली खात्री झालेली असते. त्या कलाकृतीशी इतर कलाकृतींची तुलना करता तिचे उत्कृष्टत्व अथवा निकृष्टत्व ठरवावे ह्या नात्याने टीका म्हणजे तुलना करणे असा अर्थ निर्माण होतो. ज्ञानाच्या क्षेत्रात मतभिन्नता व तुलना ह्या तत्त्वाचे अस्तित्व असल्यामुळे तुलना म्हणजे टीका असे म्हणण्यास हरकत नाही.

‘‘साहित्याच्या अंतर्गत असलेल्या साहित्यिकांचे तसेच साहित्यकृतींचा आपण तुलनेने विचार करतो आणि त्यांचे स्थान ठरवतो. अशी मूल्यमापक दृष्टी असल्याशिवाय कोणीही वाङ्मयाचा इतिहास लिहू शकणार नाही.’’[१]

मोजणे, जोखणे, तोलणे, बरोबरीचे मानणे, साम्य आणि भेद यांची पडताळणी करणे अशा वेगवेगळ्या अर्थांनी 'तुलना' हा शब्द वापरला जातो. तुलना म्हणताच एकापेक्षा अधिक घटकांची उपस्थिती गृहीत असते. तुलनेमध्ये साम्य आणि भेद यांचे एक द्वंद्व असते. त्यात भिन्नतेतील साम्य आणि साम्यातील भिन्नता यांचा शोध घेतला जातो.

साहित्याच्या निर्मितीमागे लेखकाची व्यक्तिगत प्रतिभा असते. प्रत्येक साहित्यकृती काही प्रमाणात अनन्यसाधारण असते. दोन साहित्यकृती, दोन लेखक यांच्यात काही साम्य आढळते. हादेखील आपल्या अनुभवाचा भाग आहे. त्यामुळे साहित्याच्या व्यवहारात तुलना ही सहजपणे घडणारी प्रक्रिया ठरते. साहित्यकृती किंवा साहित्यिक यांचे मूल्यमापन किंवा वाङ्मयीन परंपरेत स्थानांकन करणाऱ्या टीकेला तुलनेशिवाय आपली पावले टाकता येणार नाहीत. म्हणूनच एडमंड गॉसने ''तौलनिक समीक्षा''[२] हा समीक्षेचा एक प्रकार मानला आहे. साहित्याच्या अभ्यासात सर्वत्र मतभिन्नता किंवा तुलना यांचे अस्तित्व दिसून येते. म्हणून ''तुलना करणे म्हणजेच समीक्षा होय,''[३] असे रॉबर्टसन यांना वाटते. तुलना हे ॲरिस्टॉटलपासून वापरले जाणारे आणि साहित्यसमीक्षेला अनेक परिमाणे देणारे साधन आहे.

तौलनिक साहित्य ही आंतरविद्याशाखीय ज्ञानशाखा आहे. एकोणिसाव्या शतकातील फ्रेंच, जर्मन, इटालियन, इंग्लिश साहित्यांचे इतिहास त्यांच्यातील संबंधांकडे दुर्लक्ष करून सुटेपणाने लिहिले गेले. त्यामागे एक प्रकारचा राष्ट्रीय अभिनिवेश होता. या संकुचित राष्ट्रवादी टीकेची प्रतिक्रिया म्हणून तौलनिक साहित्याचा जन्म झाला.

''तौलनिक साहित्य'' ही संज्ञा इंग्रजीतील 'कम्पॅरेटिव्ह लिटरेचर' या संज्ञेसाठी मराठीत वापरली जाते. ती पुष्कळच वादग्रस्त ठरली आहे. ''ए बोगस टर्म दॅन मेक्स नायदर सेन्स नॉट सिंटॅक्स''[४] म्हणजे ही संज्ञा अर्थशून्य आणि व्याकरणदुष्ट आहे, असा कडवट शेरा लेन कूपर यांनी मारलेला आहे.

साहित्यकृती आणि तिची ऐतिहासिक-सांस्कृतिक पार्श्वभूमी यात द्वंद्वात्मक क्रिया घडत असतात. प्रभावशाली साहित्यकृती आणि ती स्वीकारणारी साहित्यकृती यांच्यातही अशा द्वंद्वात्मक क्रिया घडत असतात. या सर्व आंतरक्रियांचा उलगडा तौलनिक साहित्यातून होत असतो. प्रभावक आणि प्रभावित अशा दोन लेखकांमधील अनुबंधांचा मागोवा घेणे, त्यांचे स्वरूप तपासणे आणि परिणाम आजमावणे हा तौलनिक अभ्यासाचा एक महत्त्वाचा भाग ठरतो. त्यामुळेच 'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या दोन कादंबऱ्यांचा तुलनात्मक दृष्टीने अभ्यास करणे या ठिकाणी महत्त्वाचे वाटते.

## १) कादंबरीतील भाषाशैली (निवेदनशैली) :-

कोणत्याही साहित्यकृतीतील जीवनाशयाची आपणास प्रतीती येत असते ती भाषेच्या माध्यमातून आणि कादंबरीमध्ये भाषा ही निवेदनात्मक संरचनेच्या रूपाने व्यक्त झालेली असते. म्हणून कादंबरीतील जीवनाशयाच्या प्रतीतीचे स्वरूप कादंबरीचे निवेदन आणि भाषा यांच्या संरचनेशी निगडीत असते. यासाठी कोणत्याही कादंबरीच्या आकलन-मूल्यमापनासाठी निवेदन आणि भाषा यांचा विचार महत्त्वाचा ठरतो. कादंबरीतून लेखक जे सांगू किंवा सुचवू पाहतो त्याला कादंबरीची भाषिक संरचना कितपत योग्य, परिणामकारक किंवा न्याय्य आहे हे तपासून पाहावे लागते. आपल्या साहित्यकृतीविषयी लेखकाने सांगितलेला संहिताबाह्य हेतू किंवा उद्दिष्ट आणि प्रत्यक्ष कादंबरीतून व्यक्त होणारा हेतू किंवा कादंबरीचा परिणाम हे दोन्ही जुळतात की त्यात तफावत आहे, हे निवेदन आणि भाषा यांच्या अभ्यासातून तपासता येते. तेथे आपखी एक गोष्ट लक्षात घेणे आवश्यक आहे. कादंबरीचे निवेदन आणि कादंबरीची भाषा या दोन वेगळ्या संकल्पना जरी आपण वापरत असलो तरी 'कादंबरीच्या निवेदनाचा अभ्यास' आणि 'कादंबरीच्या भाषेचा अभ्यास' या दोन्हीच्या क्षेत्रमर्यादा काटेकोरपणे निश्चित करणे कठीण आहे. या दोन्ही अभ्यासाची कार्यक्षेत्रे काही एक मर्यादेपर्यंत वेगवेगळी दाखविता येतात. पण प्रत्यक्ष कादंबरीचे विश्लेषण करताना ही दोन्ही कार्यक्षेत्रे एकमेकांत मिसळलेली

दिसतात. याचे कारण उघडच आहे. केवळ निवेदनाचा विचार करावयाचा म्हटले तरी ते भाषेतूनच केलेले असते. भाषेच्या वापराचाच तो एक प्रकार असतो. त्यामुळे निवेदन विचारात भाषेचा विचार अपरिहार्यपणे येतोच. याउलट केवळ भाषेचा अभ्यास करायचे ठरविले तरी कादंबरीच्या भाषेची संरचना निवेदनात्मक असल्याने भाषाभ्यासात निवेदनात्मक स्वरूपाचा अभ्यास आवश्यक ठरतो. कादंबरीच्या भाषेचा केवळ ध्वनी, शब्द, वाक्य, व्याकरणिक वैशिष्ट्ये असा सुटा अभ्यास करून चालणार नाही. भाषेची निवेदनात्मक रचना लक्षात घ्यावी लागेल.

समाजातील विविध रंग वेचताना, समाजातील सुख-दु:खाचा अविष्कार करताना ज्या एका विशिष्ट पद्धतीचा स्वीकार करून लेखन केले जाते त्याला शैली म्हणतात. साध्या साध्या आशयाला नटवून सादर करण्याचे कार्य शैली करत असते. ही शैली लेखकपरत्वे भिन्न भिन्न असते. लेखकाची जडणघडण, संस्कार, शिक्षण, वाङ्मयाची जाण, त्याला आलेला अनुभव, त्याचे ध्येय, त्याची जीवनमूल्ये, लेखनाचा उद्देश, त्याचा आर्थिक स्तर अशा अनेक घटकांचा परिणाम शैलीवर होत असतो.

शैली हा साहित्याचा पोशाख आहे. पोषाखावरून माणूस जसा ओळखता येतो तसे शैलीवरून लेखक ओळखता येतो. प्रत्येक लेखकाची विशिष्ट अशी एक शैली असते. ती शैलीच पुढे त्याचे अंगभूत वैशिष्ट्य बनून राहते. त्याच्या व्यक्तिमत्त्वाचा ती एक भाग बनते. म्हणूनच ब्युफोने 'शैली म्हणजे लेखकच' असे म्हटले आहे. प्रत्येक लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा शैलीवर उमटलेला असतो आणि त्यातूनच लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा अंदाज बांधता येतो.

''भाषापद्धती म्हणजे बोलण्यात किंवा लिहिण्यात जी शब्दयोजना होते तिचा प्रकार''[५] असे विष्णूशास्त्री चिपळूणकर म्हणतात.

त्याचप्रमाणे भाषाशैलीविषयी बोलताना मुजुमदार म्हणतात, ''एकूण पंचतत्त्वांपासून बनलेल्या दोन मनुष्यांच्या आकृतीत ज्याप्रमाणे काहीतरी वेगळेपणा असतो, त्याप्रमाणे दोन साहित्यलेखकांच्या शब्दरचनेत काहीतरी फरक असतोच. अशा प्रकारची साहित्यातील शब्दरचनेची जी स्वयंविशिष्ट पद्धत तिला भाषाशैली असे म्हणतात.''[६]

कादंबरीच्या निवेदनाचा अभ्यास करताना निवेदनाचे प्रकार (प्रथमपुरूषी, तृतीयपुरूषी इ.), निवेदनासाठी वापरली जाणारी तंत्रे, निवेदकांचे स्थान व स्वरूप, निवेदक आणि कादंबरीतील पात्रे व निवेदन आणि वाचक यांच्या संबंधाचे स्वरूप आणि या सर्व निवेदन स्वरूपातून निवेदनाचा वापर, निवेदनस्वरूपाची परिणामकारकता इ. मुद्द्यांचा विचार निवेदनाच्या अभ्यासात करता येतो. केवळ भाषेचा अभ्यास करायचा झाला तर भाषेच्या व्याकरणिक विशेषांपासून ते भाषेच्या वाङ्मयीन, सामाजिक, सांस्कृतिक संदर्भापर्यंत विविध स्तरांवरून कादंबरीच्या भाषेचा विचार करता येतो. शब्दसंग्रह, वाक्यरचना विशेष, अलंकारिकता, प्रतिमा, प्रतिकात्मकता इ. वैशिष्ट्यांबरोबरच अनुभवप्रतीती देण्याचे भाषेचे सामर्थ्य, समकालीन तसेच पूर्वकालीन वाङ्मयीन भाषारूपाशी विशिष्ट कादंबरीच्या भाषेचा असणारा संबंध, सामाजिक, सांस्कृतिक पर्यावरणाचा भाषेवरील प्रभाव इ. विविध मुद्द्यांचा समावेश भाषेच्या अभ्यासात करता येईल.

भाषाशैली म्हणजे अंशत: शब्दांचेच सामर्थ्य व सौंदर्य. परंतु तिचे मूळ शब्दशक्तीपेक्षा लेखकाच्या अंतर्यामीच असते. ती शैली म्हणजे लिहिणाराच्या अंतर्यामीचीच शक्ती व शोभा असते. डॉ. म.मा. आळतेकर लिहितात, ''प्रत्येक लेखकाची लेखनात अभिव्यक्त होणारी विशिष्ट वृत्ती त्यालाच आकार किंवा शैली म्हणतात.''[७]

साहित्याची भाषा आणि व्यवहाराची भाषा यात फरक असतो. वामन लेले म्हणतात, ''आपण सगळेच भाषेचा वापर करतो. तसाच तो प्रतिभावान लेखकही करतो. पण ती स्वत:ची विशिष्ट उद्दिष्ट्ये साधण्यासाठी भाषेचा वापर करतो. त्याच्या प्रज्ञेचे सारे आविष्कार आणि प्रतिभेचे सारे उन्मेष भाषेच्या द्वारेच व्यक्त होतात.''[८]

अशाप्रकारे निवेदन आणि भाषा यांच्या अभ्यासाची क्षेत्रनिश्चिती करणारी ही भूमिका घेऊनच या प्रकरणात 'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबऱ्यांच्या निवेदनाचा आणि भाषेचा विचार केलेला आहे.

'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या दोन्ही कादंबऱ्या बाजीप्रभू देशपांडे यांच्या जीवनावर आधारीत आहेत. परंतु या दोन्ही कादंबऱ्यांचे लेखक वेगवेगळे आहेत. त्यामुळे त्यांच्या लेखनशैलीत बदल असलेला आढळतो. रणजित देसाई यांनी आपल्या 'पावनखिंड' या कादंबरीत बाजीप्रभू बांदलांचे दिवाण झाल्यापासून त्यांनी खिंड लढविली तिथपर्यंतचा इतिहास रेखाटलेला आहे. तर अरविंद दाढे यांनी 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीत बाजीप्रभूंच्या पूर्वजांची माहिती, बाजीप्रभूंचा जन्म, त्यांचे बालपण त्याचप्रमाणे त्यांनी खिंड लढविली तो भाग आणि शेवटी शिवाजीराजांची त्यांच्या कुटुंबाशी भेट इथपर्यंतचा इतिहास रेखाटला आहे. दोन्ही कादंबऱ्या एकाच व्यक्तिरेखेवर आधारीत असल्या तरी देखील दोन्हींमध्ये खूपच फरक असल्याचे जाणवते. बाजीप्रभूंचा सारा जीवनपट आपल्याला 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीतून समजतो तर 'पावनखिंड' मधून पूर्वीच्या इतिहासाची काहीही माहिती मिळत नाही. दोन्ही कादंबऱ्यांमध्ये प्रसंग व पात्रानुसार बदलणारी नागर व ग्रामीण बोली, निवेदनासाठी नागर भाषेचा वापर, बखरीतील शब्दांचा वातावरणनिर्मितीसाठी करून घेतलेला उपयोग, वाक्प्रचार, म्हणी, स्वगत आणि सूचक व नाट्यपूर्ण अर्थाने भरलेले संवाद ही वेगवेगळी वैशिष्ट्ये आढळतात. त्याचप्रमाणे 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीत शिवाजीराजांनी बाजींना लिहिलेल्या पत्राचा नमुनादेखील आलेला आहे. या पत्रांमुळे त्या काळातील संस्कृत-फार्शी मिश्रित भाषेचा दाखला पाहावयास मिळतो.

रणजित देसाई यांच्या सर्वच कादंबरीतील नायकांचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येकजण दु:खी, एकाकी आणि एखादे शल्य आयुष्यभर उराशी बाळगत जगत राहणे आणि शेवटी त्यातच जीवनाचा अंत होणे. 'पावनखिंड' मधील बाजीप्रभू याला अपवाद ठरतो. 'स्वामी' आणि

नंतरच्या कादंबऱ्यांचे नायक धीरोदत्त, भव्यदिव्य जीवनाची उत्तुंग मूल्ये जपणारे आहेत. त्यापायी त्यांचे अंत शोकाकुल तरी झाले आहेत किंवा त्यांचे सारे जीवन तरी शोकमग्न झाले आहे. बाजीप्रभूंच्या बाबतीत हे पूर्णपणे मान्य करता येत नाही. कारण बाजींचे संपूर्ण जीवन शोकमग्न नव्हते. प्राणाची बाजी लावून शिवाजी राजांच्यासाठी लढताना ते नेहमीच आनंदी व समाधानी राहिले.

अरविंद दाढे यांनी 'महारूद्र बाजीप्रभू' ही कादंबरी लिहीत असताना अतिशय काळजीपर्वूक व अतिशय कौशल्याने बाजीप्रभूंचा इतिहास रेखाटलेला आहे. कादंबरीमध्ये बाजींच्या वंशजांचा आणि पूर्वजांचा इतिहास सांगितल्यामुळे बाजीप्रभू कशाप्रकारे घडले हे कळून येते. त्यांची स्वामीनिष्ठा व राष्ट्रप्रेमाचे दर्शनही या ठिकाणी होते. सारा इतिहास कादंबरी वाचत असताना डोळ्यांसमोर घडताना दिसतो. त्यांनी इतिहासाला कोणत्याही प्रकारे तडा जाऊ नये याची पुरेपूर काळजी घेतल्याचे दिसून येते. कल्पनेचा वापर केलेला असला तरीदेखील वास्तवतेवर जास्त भर दिल्याचे दिसून येते.

बाजी शूर, मुत्सद्दी होते. मराठी राज्यासाठी त्यांनी प्राणाचे बलिदान केले हे सर्वमान्य आहे. परंतु 'पावनखिंड' या संपूर्ण कादंबरीमध्ये मनाला खिळवून ठेवली अगर बाजींचे श्रेष्ठत्व निर्विवादपणे आपोआप मनावर ठसेल अशाप्रकारचे चित्रण फारसे प्रभावीपणे येताना दिसत नाही. परंतु शेवट मात्र अतिशय परिणामकारक झाला आहे. 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीमध्ये आलेला बाजींच्या आईचा डोहाळजेवणाचा कार्यक्रम, बाजींच्या बारशाचा कार्यक्रम त्याचप्रमाणे बाजी कुस्ती जिंकतात तो प्रसंग असे अनेक प्रसंग दाढेंनी या कादंबरीमध्ये प्रभावीपणे रेखाटले आहेत. त्यांची भाषाशैली देखील त्यावेळी अतिशय प्रभावी बनली आहे.

राजांचा बाजींवर किती विश्वास होता आणि तो बाजींनी आपल्या प्राणाची बाजी लावून सार्थ ठरविला हा या दोन्ही कादंबरीचा मुख्य केंद्रबिंदू ! 'लक्ष्यवेध'मध्ये ज्याप्रमाणे एकाच घटनेभोवती कथानक फिरते त्याचप्रमाणे 'पावनखिंडी'मध्ये एकाच व्यक्तीभोवती

कथानक रणजित देसाईंनी फिरते ठेवले आहे. चरित्रप्रधान कादंबरी आणि घटनाप्रधान कादंबरी यांच्यामध्ये मग हाच फरक पडतो. घटनाप्रधान कादंबरीत मग घटना कथानकाच्या ओघात घडत जातात. व्यक्तिप्रधान कादंबरीत मात्र घटना त्या व्यक्तीच्या चित्रणाला उठाव आणण्यासाठी पार्श्वभूमी म्हणून वापरल्या जातात. बाजींच्या जीवनाची इतिश्री ही शिवाजी राजांच्या पर्यायाने मराठी राज्याच्या रक्षणासाठी होते. म्हणजेच या कादंबरीचा शेवट हा मनाला स्पर्शून जातो.

'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीत मात्र लेखकाने बाजींचा संपूर्ण जीवनपट वाचकांसमोर मांडलेला दिसून येतो. त्यांच्या प्रभावी निवेदनशैलीमुळे कादंबरीमध्ये घडणारा प्रत्येक प्रसंग आपल्या डोळ्यासमोर साकार होतो. त्यांची भाषा ओघवती व पात्रांनुसार बदलती असल्याचेही जाणवते. बाजींच्या जीवनामध्ये घडलेले महत्त्वाचे प्रसंग त्याचप्रमाणे कौटुंबिक माहिती देखील या कादंबरीत येते. 'पावनखिंड'मध्ये बाजींच्या जीवनातील उत्तरार्धाचा भाग येतो. अगोदर बांदल राजांचे प्रधान असलेले बाजी प्रत्यक्ष राजांनी जगदंबेची शपथ घेतल्यावर राजर्षी होतात. बाजी व फुलाजी या दोघा बंधूंचा स्वभाव, त्यांचे शौर्य, रोहिडा जिंकूनही त्यांचे वतन बांदलांकडेच ठेवण्याची मागणी करणारे बाजी, राजांना प्रत्यक्ष भवानी माताच प्रसन्न आहे असे मानणारे बाजी अशी बाजींची विविध रूपे या कादंबरीत दिसतात. 'लक्ष्यवेध'मध्ये रणजित देसाईंनी महाराजांचे कौटुंबिक जीवन काही प्रमाणात रंगविलेले जाणवते. मात्र 'पावनखिंड'मध्ये बाजींच्या बंधूंचा फुलाजींचा उल्लेख येतो. बाजींच्या दोन पत्नी सोनाबाई-गौतमाई यांचाही ओझरता उल्लेख कादंबरीच्या अगदी सुरूवातीस येतो. बाजींच्या जीवनातील एकही कौटुंबिक प्रसंग देसाईंनी रंगवू नये याचे मात्र आश्चर्य वाटते.

'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीमध्ये मात्र योग्य त्या ठिकाणी प्रत्येक प्रसंगाचे वर्णन आलेले आहे. बाजीप्रभू राजांना घेऊन अंधाऱ्या रात्री पन्हाळगडावरून निघतात. त्याचे वर्णन पुढीलप्रमाणे केलेले आहे. ''अत्यंत जिद्दीनं हिरडस मावळातील मावळे मंडळी राजांची पालखी

पळवत होते. जगाच्या इतिहासात अत्यंत दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर एवढ्या लांबची दौड पडत्या पावसात, काट्याकुट्यातून भयानक जंगली श्वापदांच्या विळख्यातून, साप, विंचू, काटे, दगड, धोंडे तुडवत कोणी केली आहे काय ? डोळ्यांत बोट घातलं तरी दिसणार नाही अशा बिकट परिस्थितीत ही दौड वेड्या माणसांची साक्षात्कारी दौड होती. वेड्यासारखी ही माणसे अतिशय कठीण परिस्थितीत, प्रचंड पावसात, अनंत अडचणींतून राजांची पालखी खांद्यावर घेऊन एकसारखी विशाळगडाच्या दिशेने धावत होती ....''[९]

वरील वर्णन अतिशय चित्तथरारक, तो प्रसंग साक्षात उभे करणारे आणि वातावरण पोषक आहे.

रणजित देसाई आणि अरविंद दाढे या दोन्ही लेखकांनी बाजीप्रभूंच्या आयुष्यातील शेवटच्या प्रसंगाचे अत्यंत हृदयस्पर्शी वर्णन केले आहे. बाजीप्रभू ज्यावेळी खिंड लढवत असतात त्यावेळी त्यांच्या कुटुंबाला त्याविषयी काहीही माहीत नसते. त्यांची मानसिकता अरविंद दाढे यांनी अतिशय समर्पकपणे मांडलेली आहे.

''ज्येष्ठातली वटसावित्रीची पौर्णिमा होऊन गेली. गौतमाई-सोनाईंनी शिंदच्या वेशीबाहेर असणाऱ्या भल्यामोठ्या वडाची पूजा केली. अगदी नटून-थटून, नाकात नथी घालून वडाला प्रदक्षिणा घातल्या. कपाळी वडापाशी कुंकू रेखून मनोभावे वडाला साकडं घातलं. पण का कोणास ठाऊक या ज्येष्ठी पौर्णिमेपासून सोनाईंचा उजवा डोळा एकसारखा लवू लागला. अन् सोनाईंच्या काळजात धस्स झालं. तिन्हीसांजेला टिटव्यांचे अशुभ कर्कश्श ओरडणे गौतमाईंना वाईट चिन्हे दाखवीत होते.''[१०]

अशाप्रकारे बाजींच्या पत्नींची मन:स्थिती व बाजींबद्दल त्यांना वाटणारी काळजी याचे वर्णन केले आहे. रणजित देसाईंनी मात्र त्यांच्या कुटुंबाचे किंवा इतर व्यक्तींचे कोणतेही वर्णन घेतले नाही. बडी बेगम आणि शहाजी राजे यांच्यातील संवाद 'पावनखिंड'मध्ये आले आहेत. त्याचप्रमाणे बडी बेगम शहाजी राजांना आपल्या मुलाला शिवाजी राजांना समजावून सांगण्याविषयी सुचवते हा भाग आलेला आहे.

'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या दोन्ही कादंबऱ्यांतील साम्य दाखवणारा प्रसंग म्हणजे गजापूरच्या खिंडीत सिद्दी व बाजींची लढाई. पन्हाळगडावरून विशाळगडाकडे जात असताना शत्रू जवळ आल्याचे समजताच शिवा काशिदला शत्रूच्या गोटाकडे जाण्यास सांगून बाजी, शिवाजीराजे पुढे निघतात. परंतु पुढे गेल्यानंतर देखील शत्रूचा पाठलाग सुरूच असतो. त्यामुळे बाजी प्रसंगावधान राखून राजांना विशाळगडाकडे जाण्यास सांगतात. परंतु राजे म्हणतात, ''नाही, बाजी ! तुम्हांला सोडून आम्ही जाणार नाही. जे व्हायचं असेल ते होऊ दे.''[११] असा भाग 'पावनखिंड'मध्ये येतो. तर 'महारूद्र बाजीप्रभू'मध्ये राजे म्हणतात, ''नाही बाजी, तुम्हाला मरणाच्या तोंडी सोडून आम्हाला पुढे जाण्याची इच्छा नाही. आम्हीसुद्धा तुमच्या खांद्याला खांदा देऊन शत्रूशी झुंजू.''[१२]

दोन्ही कादंबऱ्यांमध्ये आलेला वरील भाग हा एक विलक्षण योगायोग आहे. त्याचप्रमाणे बाजींनी स्वराज्यासाठी व स्वामीसाठी अखेरच्या क्षणापर्यंत लढून प्राणांची बाजी लावली. या घटनेने राजे भावनाशील होतात. हा भागही दोन्ही कादंबऱ्यांमध्ये येतो.

अरविंद दाढे यांनी प्रत्येक ठिकाणी बाजींच्या व्यक्तिरेखेला आपल्या निवेदनशैलीतून व भाषाशैलीतून उठाव देणारे प्रसंग निर्माण केलेले आहेत. त्यामुळे बाजीप्रभूंची व्यक्तिरेखा उठावदार झाली आहे. परंतु 'पावनखिंड' मध्ये शेवटच्या गजापूरच्या खिंडीतील बलिदानाने त्यांची व्यक्तिरेखा अतिशय उंचीवर जाते.

'पावनखिंड' या कादंबरीची सुरूवात गावकऱ्यांच्या ज्या अनेक समस्या, प्रश्न आहेत त्यांना बाजी योग्य तो सल्ला देतात अशी होते. त्याचप्रमाणे बाजींच्या जीवनातील उत्तरार्धाचा भाग यामध्ये येतो. ज्यावेळी शिवाजीराजे रोहिडा किल्ला आपल्या ताब्यात घेण्यासाठी जातात तेव्हा त्यांची बाजींशी थोडी चकमक होते. शिवाजीराजांना बाजीप्रभू त्याचप्रमाणे बाजी बांदल स्वराज्यात यावेत असे वाटत होते. त्यामुळेच ते रोहिडा किल्ल्यावर जातात. त्यावेळी त्यांच्यासोबत तानाजी, येसाजी, आबाजी यांसारखी धारकरी माणसे होती. शिवाजीराजांना

बाजींना गडकोटाची बांधणी करण्याची आवड होती हे माहीत होते. त्यामुळे ते जासलोड गडाची दुरूस्ती करण्याचे काम बाजींवर सोपवतात. जासलोड गडाचे किल्लेदार विठोजी गडकरी यांच्या साहाय्याने दुरूस्तीचे काम पार पाडतात. शिवाजीराजे बाजी-फुलाजींना राजगडावर बोलावतात. दोघेजण राजगडावर राजांच्या भेटीसाठी गेल्यानंतर त्यांचे स्वागत तानाजी आणि गुप्तहेर खात्याचे प्रमुख बहिर्जी नाईक करतात. यावरून शिवाजीराजांचे गुप्तहेर खाते किती जागृत होते हे दिसून येते.

शिवाजीराजांच्या पारिपत्यासाठी अदिलशहाने अफाट संपत्ती अफजलखानाच्या हवाली केली होती. परंतु राजांनी अफजलखानाचा वध केल्यामुळे अदिलशहाची बरीच हानी झाली होती. विजापूरची बडी बेगम शिवाजीचा पराभव ऐकण्यास उत्सुक होती. परंतु तिची निराशा झाली. या प्रसंगाचे वर्णन 'पावनखिंड' मध्ये आलेले आहे. मानाजी नाईक हे जरी पन्हाळगडाचे किल्लेदार असले तरी सत्ता सय्यदखानाकडेच होती परंतु राजे कोल्हापूर जिंकून घेतल्यानंतर पन्हाळगडाचा ताबाही स्वत:कडे घेतात. हा भागदेखील यामध्ये येतो.

'पावनखिंड' ही कादंबरी जरी बाजीप्रभू देशपांडे यांच्या जीवनावर आधारीत असली तरी शिवाजीराजांचा बराचसा भाग यामध्ये येतो. शिवाजीराजांनी स्वराज्यस्थापनेसाठी अनेक किल्ले आपल्या ताब्यात घेतले त्यासाठी त्यांना मोगल राजांशी निकराची झुंज द्यावी लागली. या सर्व गोष्टींचे वर्णन 'पावनखिंड' मध्ये आलेले आहे. शिवाजीराजांनी स्वराज्य निर्माण करण्यासाठी आपल्या पदरी अनेक पराक्रमी लोक जमा केले होते. त्यातीलच बाजीप्रभू देशपांडे ही एक व्यक्ती. रणजित देसाईंनी शिवाजीराजांनी स्वराज्यसाधनेसाठी जे प्रयत्न केले, किल्ले ताब्यात घेतले या प्रसंगाबरोबरच बाजींनी गजापूरच्या घोडखिंडीमध्ये स्वामीनिष्ठा आणि देशभक्तीसाठी आपल्या प्राणांची बाजी लावली हा प्रसंग अतिशय चित्तथरारक असा रेखाटलेला आहे.

'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीमध्ये बाजीप्रभूंच्या पूर्वजांचा इतिहास सांगितला आहे. त्याच्या एकूण जीवनावर आधारीत अशी कादंबरी आहे. बाजींचे आजोबा पिलाजीप्रभू देशपांडे यांनी खऱ्या अर्थाने बाजींना घडविले हा देखील भाग येतो. शिवाजीराजांना बाजी स्वराज्यसाधनेत यावे असे वाटत होते. कारण बाजी स्वराज्यसाधनेत आल्यानंतर बाजी बांदल आणि त्यांचे सहकारी यांची अफाट शक्ती स्वराज्याला मिळणार होती. त्यासाठी राजे बाजींच्या भेटीला जातात. त्यांच्यात समेट होते व बाजी स्वराज्यस्थापनेची शपथ घेतात. त्यानंतर राजे कान्होजी जेधे, कान्होजी नाईक यांनाही भेटतात याचेही वर्णन कादंबरीमध्ये आले आहे.

सिद्दी जौहरचा पन्हाळगडाला वेढा पडतो. त्यावेळी राजे चिंताग्रस्त होतात. परंतु राजे नंतर पन्हाळ्यातून सुटून जाण्याचा बेत आखतात. ते वेढ्यातून सुरक्षितपणे विशाळगडावर पोहोचतात परंतु बाजी गजापूरच्या घोडखिंडीमध्ये आपल्या प्राणांची आहुती देतात हे राजांना समजल्यावर राजे भावनाविवश होतात आणि नंतर बाजींच्या घरी त्यांच्या कुटुंबाचे सांत्वन करण्यासाठी जातात. अशाप्रकारचे वर्णन या कादंबरीमध्ये आलेले आहे. 'महारूद्र बाजीप्रभू' ही कादंबरी बाजीप्रभूंच्या जीवनावर आधारीत आहे. त्यामुळे बाजींच्या पूर्वजांचा इतिहास यामध्ये वाचावयास मिळतो. बाजींच्या व्यक्तिरेखेभोवती संपूर्ण पात्रे येताना दिसतात. त्यामुळे बाजींचे व्यक्तिचित्र उठावदार झाले आहे.

'सकाळ' वर्तमानपत्रामधील परीक्षणामध्ये 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीविषयी डॉ. सदाशिव शिवदे म्हणतात, "...... या महारूद्राची नव्हे, तर मृत्युंजय अशा मराठी बाजीप्रभूची रोमहर्षक, जीवाला चटका लावणारी पण जिद्द चेतविणारी कथा मराठी मनाला स्वातंत्र्यप्रेमाचे सतत आवाहन करीत राहील, यात शंका नाही. कादंबरीतील संवाद हा या कादंबरीचा प्राण आहे आणि म्हणून ती वाचकाच्या अंत:करणास भिडते. हिरडस मावळ परिसर, पन्हाळा, विशाळगड परिसर आणि बाजीप्रभूंची अखेरची झुंज या गोष्टी अतिशय सरस उतरल्या आहेत. इतिहासाला कोठेही बाधा न आणता अत्यंत रसाळ आणि भरदार

भाषेत लिहिलेली ही कादंबरी मराठी सारस्वतात मोलाचे स्थान प्राप्त करील, यात शंका नाही.''[१३]

'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या दोन्ही कादंबऱ्या 'बाजीप्रभू देशपांडे' या व्यक्तिरेखेवर आधारीत आहेत. दोन्ही कादंबऱ्यांमध्ये बाजींचे जे वर्णन, जे प्रसंग आले आहेत ते सारखेच आहेत. तरीही दोन्ही लेखकांच्या शैलीनुसार त्यामध्ये वेगळेपणा हा जाणवतोच. रणजित देसाई हे एक प्रसिद्ध लेखक आहेत. त्यांची शैली ओघवती व प्रभावी आहे. तर अरविंद दाढे यांची लेखनशैली साधी, सरल, प्रासादिक व परिणामकारक आहे.

रणजित देसाई आणि अरविंद दाढे यांनी लिहिलेल्या 'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या दोन्ही कादंबऱ्या अतिशय परिणामकारक आहेत. त्याकाळच्या ग्रामीण भाषेचा वापर केलेला आढळतो. त्याचप्रमाणे प्रसंगानुरूप त्यांनी आपल्या निवेदनशैलीमध्ये, भाषाशैलीमध्ये बदल केलेला आहे. दोन्ही कादंबऱ्यांमध्ये जो गजापूरच्या घोडखिंडीतील लढाईचा प्रसंग आलेला आहे तो प्रसंग अतिशय चित्तथरारक आहे. कादंबऱ्या वाचत असताना जणूकाही सारा इतिहास आपल्या डोळ्यांपुढे घडतो आहे असा भास निर्माण होतो. काही संवाद वाचत असताना प्रसंगी आपल्या डोळ्यांतून पाणी आल्याशिवाय राहत नाही.

अशारितीने 'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या दोन्ही कादंबऱ्यांमध्ये असलेली निवेदनशैली व भाषाशैली यामध्ये असणारे साम्य व त्यातील भिन्नत्व दिसून येते.

## २) स्वामीनिष्ठा व देशभक्ती :-

काही माणसे अशी असतात की, स्वत: संकटं भोगतात आणि देशाला सामर्थ्य देतात. जगभरातील महापुरूषांची नियतीने आणि निसर्गाने अशीच सत्त्वपरीक्षा घेतली आहे. विश्वकल्याणासाठी प्रसंगी आत्मयज्ञ वा प्रकाश समाधी ही अपवादात्मक दैवी प्रेरणा आहे. हौतात्म्य स्वीकारणारे हुतात्मे, राष्ट्रासाठी प्राणाहुती देणारे सैनिक, स्वातंत्र्यासाठी फासावर जाणारे देशप्रेमी यांच्यात तेजस्विता प्रकट होते.

"जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती ।

देह कष्टविती उपकारे ।

भूतांची दया हे भांडवल संता ।

आपुली ममता नाही देही ॥

सत्य झाकणारे झाकण या जगात अजून कोणी शोधून काढलं नाही. तसेच असत्याचे दुष्परिणाम टाळणारे रसायनही अजून कोणी तयार केले नाही. सत्य उणं असलेलं शौर्य स्थिर रहात नाही. स्वत:साठी जगायचे असेल तर, अल्पकाळ जगता येते. अनंत काळ जगायचं असेल, तर मात्र दुसऱ्यासाठीच जगायचं असतं.

Do your best and leave the rest

What is the use of worry ?

Fine endeavour stand the test

More than haste or hurry."[१४]

"छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात मराठ्यांचं स्वतंत्र राज्य स्थापन झालं आणि १८१८ पर्यंत ते टिकलं. या पार्श्वभूमीवर ज्यांनी भारतावर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे नियंत्रण केलं असा मराठा हा एकमेव वर्ग आहे. (इथे 'मराठा' हा शब्द विशिष्ट समाजासाठी अभिप्रेत नसून महाराष्ट्रातील नागरिक या अर्थाने आहे.) या समाजाचं पूर्ण भारतभर राजकीय साम्राज्य होतं."[१५]

"महाराष्ट्राच्या सामाजिक आणि राजकीय इतिहासातील म. फुले, लोकहितवादी गोपाळ हरी देशमुख, न्या. रानडे, लोकमान्य टिळक, राजर्षी शाहू छत्रपती, महर्षी शिंदे, डॉ. आंबेडकर, स्वा. सावरकर इ. सर्वच व्यक्ती आदरणीय आणि वंदनीय आहेत."[१६]

भगतसिंग, सुखदेव व राजगुरू यांचेही भारतीय स्वातंत्र्ययुद्धात अग्रगण्य स्थान आहे. देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून त्यांनी कोणताही विचार न करता आपल्या प्राणांचे बलिदान केले.

भारतीय स्वातंत्र्ययुद्धातील प्रथम क्रांतिकारक आणि शेवटी महान योगी म्हणून गाजलेल्या अरविंद घोषांचा गौरव करताना त्यांचे चरित्रकार शिवाजीराव भोसले लिहितात, ''त्यांनी राजकारणाला देशकारणांचे व देशकारणास धर्मकारणाचे व धर्मकारणास विश्वकल्याणाचे रूप दिले. राजकीय स्वातंत्र्य हे परब्रह्म व पूर्ण स्वराज्य हे त्याचे सगुण रूप समजून श्री. अरविंदांनी त्याची आराधना आरंभिली. इतर देशभक्तांप्रमाणे स्वदेशी, बहिष्कार, असहकार व नि:शस्त्र प्रतिकार या साधनांचा त्यांनीही अवलंब केला. साधनांची शुचिता असल्यामुळे त्यांची राजनीती समकालीन विचारवंतांहून भिन्न होती. केवळ नि:शस्त्र प्रतिकाराने देश मुक्त होईल यावर त्यांचा विश्वास नव्हता. प्रसंगी देशव्यापी सशस्त्र उठाव करावा हे त्यांचे ठाम मत होते. त्यामुळे देशातील सर्व भूमिगत व सशस्त्र संघटनांशी त्यांचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष संबंध होताच.''[१७]

देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून देशभक्तीमुळे अनेक क्रांतिकारकांनी सर्वस्वाचे, प्राणांचे बलिदान दिले. त्याचे उदाहरण द्यायचे झाले तर ते पुढीलप्रमाणे देता येईल. ''लोकांच्या चळवळी चिरडून टाकण्यासाठी सरकारने जुलमी बिले अस्तित्वात आणली. या जुलमी कायद्यांना विरोध जाहीर करावा म्हणून ८ एप्रिल १९२९ रोजी भगतसिंग व बटुकेश्वर दत्त यांनी मध्यवर्ती असेंब्लित बॉंब टाकला. भगतसिंग, राजगुरू इत्यादी सर्वांना अटक झाली. २३ मार्च १९३१ रोजी लाहोरच्या तुरूंगात सुखदेव, राजगुरू व भगतसिंग यांना रात्रीचे वेळी फाशी दिली आणि त्यांच्या देहाचे दहनही सरकारने केले. क्रांतिकारकांनी हसत हसत सोसलेला प्राणदंड साऱ्या भारताचा अभिमानाचा व आदराचा विषय झाला. क्रांतिकारक फासावर गेले या घटनेमुळे लहान लहान मुलेही सरकारविरोधी भावनेने भारली गेली.''[१८]

स्वामी दयानंद सरस्वती यांच्या आयुष्यात लहानपणी जीवनाला कलाटणी देणाऱ्या काही घटना घडल्या. त्यामुळेच त्यांनी २१ व्या वर्षी गृहत्याग केला. त्यानंतर त्यांनी वैदिक धर्माचा प्रसार केला. इ.स. १८६९ मध्ये त्यांनी काशीच्या सनातनी ब्राह्मण पंडितांशी

शास्त्रार्थावर वादविवाद केला. त्यामुळे ह्यांचे नाव सर्वत्र गाजले. ''इ.स. १८५७ च्या असफलतेपासून तर काँग्रेसच्या स्थापनेपर्यंत भारतीयांच्या हृदयामध्ये स्वातंत्र्यप्रेम जागृत ठेवण्याचे कार्य ज्या ज्या महापुरूषांनी केले त्यापैकी दयानंद हे एक होते. भारतातून ब्रिटिशांना हाकलण्याकरिता सशस्त्र क्रांती हा एकमेव मार्ग आहे, अशी स्वामी दयानंदांची पक्की खात्री होती. आर्यसमाज आणि गुरूकुल यामध्ये राष्ट्रभक्तांना सशस्त्र क्रांतीकरिता प्रेरणा आणि प्रशिक्षण मिळत असे.''[१९]

राष्ट्रीय आंदोलनामध्ये ज्या व्यक्तींनी सहभाग घेतला. त्यांपैकी लोकमान्य टिळक हे एक. ''इ.स. १९१६ मध्ये त्यांनी डॉ. ॲनी बेझंट यांच्या सहकार्याने 'होमरूल लीग' या संघटनेची स्थापना केली. भारतीय होमरूल चळवळीने स्वयंशासनाचे अधिकार ब्रिटीश सरकारकडे मागितले... 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे व तो मी मिळविणारच' असे टिळकांनी ठामपणे सांगितले. होमरूल चळवळीमुळे राष्ट्रीय आंदोलनात नवचैतन्य निर्माण झाले.''[२०]

अशारीतीने आपल्या देशातील अनेक क्रांतिकारकांनी आणि समाजसुधारकांनी आपल्या प्राणांची आहुती देशासाठी, देश स्वतंत्र व्हावा यासाठी दिली.

'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या दोन्ही कादंबऱ्या स्वामीनिष्ठा आणि देशप्रेमासाठी आपल्या प्राणांचे बलिदान केलेल्या बाजीप्रभू देशपांडे यांच्यावर आधारीत आहेत. ज्यावेळी शिवाजी महाराज कृष्णाजी बांदलाने रयतेवर केलेल्या अन्यायाची परखड शब्दांमध्ये बाजींना जाणीव करून देतात. त्यावेळी बाजी त्यांच्या शब्दाने भारावून जातात आणि म्हणतात, ''खऱ्या अर्थाने देव, देश आणि धर्म यांचे जागरण करणाऱ्या शिवप्रभूंच्या पाठीशी आम्ही सदैव उभे राहू. आता आमचे जीवन आणि मरण श्रींच्या इच्छेने शिवाजीराजांच्या पायाशी असेल. आम्हा देशपांडेप्रभूंच्या कुलस्वामिनीच्या साक्षीने, आदिशक्ती मळाईमातेच्या शपथेने सांगतो, आबाजी ! आजपासून आम्ही आमच्या निष्ठा राजांच्या पायी वाहिल्यात.''[२१] बाजींच्या या वाक्यावरून त्यांची स्वामीनिष्ठा व देशाविषयीची तळमळ याठिकाणी स्पष्टपणे दिसून येते.

त्याचप्रमाणे शिवाजी - अफजल भेट प्रतापगडाच्या पायथ्याशी होण्याचे ठरते त्यावेळी देखील बाजी राजांबरोबर जाण्याचे ठरवितात. परंतु राजे त्यांना समजावतात व एकटे अफजलखानाच्या भेटीस जातात.

सिद्दी जौहरचा पन्हाळगडाला वेढा पडतो त्यावेळी बाजी, फुलाजी आणि शिवा हे तिघेही राजांबरोबर सतत सावलीसारखे उभे असतात. यावरून त्यांना राजांबद्दल वाटणारी तळमळ आणि अपार प्रेम दिसून येते. पन्हाळगडाला पडलेला सिद्दीचा वेढा ४-५ महिने झाले तरी उठत नाही. त्यावेळी शिवाजीराजे पन्हाळगडावरून विशाळगडाकडे जाण्याचे ठरवितात. त्यावेळी बाजी शिवा काशिदला एक जोखमीची कामगिरी सोपवितात व म्हणतात, ''एवढी सोपी जोखीम नाही ही ! प्रसंग आला, तर जीव गमवावा लागेल. चालेल ?'' त्यावर शिवा म्हणतो, ''जीव ! त्याची बढाई कशाला सांगता ? कवाबी मरायचं नव्हं ? पन जीवन ओवाळून टाकावं, असं कुणीतरी भेटायला हवं !'' बाजी म्हणतात, ''तुझ्याच नशिबी ते भाग्य आहे. रात्री राजांना घेऊन आम्ही गडाबाहेर जाणार आहोत. तुला दुसरे राजे बनायला हवं. दुर्दैवानं राजांची जाग मेटेकऱ्यांना लागली, तर तुला राजे बनून सिद्दीच्या छावणीवर जावं लागेल. राजे वेढ्याबाहेर जाईपर्यंत तुला सिद्दीला गुंतवावं लागेल. आहे तयारी ?'' शिवा म्हणतो, ''असली संधी कोण सोडंल ? आता बेत बदलू नका. ती जोखीम माझी.''[२२] वरील संवादावरून आपल्या राजासाठी आणि स्वराज्यासाठी कोणत्याही क्षणी प्राण पणाला लावणारी माणसे राजांच्या दरबारी होती हे दिसून येते.

'लाख मेले तरी चालतील परंतु लाखाचा पोशिंदा वाचला पाहिजे' असा विचार करणारी माणसे राजांजवळ होती. स्वराज्यासाठी व आपल्या स्वामींसाठी अहोरात्र कष्ट सहन करणारी त्याचप्रमाणे कसलाही विचार न करता आपल्या सर्वस्वाचा व प्राणाचा त्याग करण्यास तयार असणारी माणसे होती.

पन्हाळगडावरून उतरल्यानंतर थोड्याच वेळात शत्रू सावध होतो. त्यामुळे शिवाची पालखी शत्रूच्या डेऱ्याकडे जाते. त्याठिकाणी आपल्या राजासाठी, स्वामीभक्तीमुळे,

देशभक्तीमुळे शिवा आपल्या प्राणांचे बलिदान करतो. तर गजापूरच्या खिंडीत राजांना विशाळगडाकडे जाण्यास सांगून बाजी-फुलाजी जेमतेम दोन माणसे खिंडीतून जाऊ शकतील अशा ठिकाणी शत्रूला थोपवून धरतात, त्यांच्याशी लढतात. लढत असताना बाजी-फुलाजींच्या अंगावर असंख्य जखमा होतात. तरीही ते लढतात. गजापूरच्या खिंडीत अंगावर मोजता येणार नाहीत इतक्या जखमा झाल्यानंतरसुद्धा माझा राजा विशाळगडाला सुखरूप पोहोचल्याशिवाय मी मरणार नाही. या भावभक्तीच्या भावनेतून स्वामीनिष्ठ असणाऱ्या बाजींचं व्यक्तिमत्त्व उठून दिसतं. तोफेचा इशारा झाल्यानंतर बाजी राजांना शेवटचा मुजरा करण्यास विसरत नाहीत. बाजींच्या चेहऱ्यावर मरणोत्तर स्वामीकार्य केल्याचे चिरंतन समाधान दिसून येते. बाजींचं सारंच कुटुंब स्वामीनिष्ठेनं बांधलेलं होतं आणि म्हणूनच स्वराज्यासाठी आणि स्वामीकार्यासाठी देशपांड्यांना पुन्हा रक्त सांडण्याची संधी द्या अशी मागणी ''राजे, ही समशेर तुमच्या हाताने महादजीच्या कमरेला बांधा, अन् ज्या वेळी हिंदवी स्वराज्य अन् राजे अडचणीत येतील, त्या त्या वेळी देशपांडेप्रभूंना रक्त सांडण्याची संधी द्या,''[२३] वरील शब्दांमध्ये बाजींची पत्नी गौतमाई राजांजवळ करते.

अशारीतीने अनेक प्रसंगातून बाजींच्या स्वामीनिष्ठेचे व देशभक्तीचे दर्शन 'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीतून घडलेलं आहे.

**३) उद्देश :-**

प्रत्येक लेखकाचा कादंबरी लेखनामागे काही ना काही उद्देश असतो. रणजित देसाई यांनी लिहिलेली 'पावनखिंड' ही त्यांची शेवटची ऐतिहासिक कादंबरी आहे. बाजींनी स्वराज्यासाठी आपली निष्ठा आणि पराक्रमाच्या साहाय्याने गजापूरच्या खिंडीची 'पावनखिंड' बनविली. म्हणूनच या वीर बाजींच्या जीवनावर प्रकाश टाकण्यासाठी रणजित देसाई प्रवृत्त झाले आणि त्यांनी 'पावनखिंड' ही कादंबरी लिहिली. 'स्वामी', 'श्रीमानयोगी' लिहिताना लेखकावर इतिहासाची आणि समाज-परिस्थितीची काही बंधने होती. पण ही कादंबरी मात्र

आपण मुक्त मनाने लिहिल्याने ती चांगली होईल असा विश्वास मनाशी बाळगून ही कादंबरी लिहिली गेली आहे.

१९६० नंतरच्या ऐतिहासिक कादंबरीच्या परंपरेतील वेगळ्या प्रकारची कादंबरी लिहिण्याचा हेतू मनाशी बाळगून रणजित देसाई यांनी ही कादंबरी लिहिली. 'बाजीप्रभू देशपांडे' या शिवशाहीतील पराक्रमी पुरूषावर लिहिली गेलेली मराठीतील ही पहिली कादंबरी आणि योगायोगाने लेखकाची ही अखेरची ऐतिहासिक कादंबरी ठरली !

अरविंद दाढे यांची 'महारूद्र बाजीप्रभू' ही पहिलीच ऐतिहासिक कादंबरी रणजित देसाईंनी बाजीप्रभूंच्या जीवनावर लिहिलेल्या 'पावनखिंड' या कादंबरीनंतर अरविंद दाढे यांनी लिहिलेली ही दुसरी कादंबरी. रणजित देसाई फार मोठ्या उंचीचे लेखक आणि अभ्यासक. स्वामी, श्रीमानयोगी या त्यांच्या सुप्रसिद्ध व लोकप्रिय कादंबऱ्या, त्यांची 'पावनखिंड' ही कादंबरी ऐतिहासिक मूल्य म्हणून सुंदर आहेच पण पन्हाळगड ते विशाळगड एवढाच संबंध त्यात रेखाटलेला आहे. परंतु 'महारूद्र बाजीप्रभू' ही कादंबरी लिहिताना बाजींच्या अगोदरचा पाच-सहा पिढ्यांचा इतिहास आणि ज्या गुंजनमावळापासून हिरडस मावळ आणि रोहिड खोरे, नीरा-वेळवंडीचा प्रदेश, बाजींचं सारं जीवन याच प्रदेशाची निगडित होतं ते नातं दाखविण्याचा प्रयत्न लेखकाने या कादंबरीतून केलेला आहे.

मध्यप्रदेशातील मंडूगडचा इतिहास पाहायचा झाला तर मालकदेव राजाचा प्रधान-कोकाप्रधान हा बाजीप्रभूंचा पूर्वज होता. त्याने अल्लाउद्दीन खिलजीच्या ऐनुलूमुल्क नावाच्या सेनापतीशी प्रखर लढा देऊन धर्मरक्षणासठी रक्त सांडलं. ही घटना लेखकाने जिजाऊ माँसाहेबांच्या मुखातून बाजींना ऐकविली आहे. या कथेत वीरश्रींची परंपरा आहे, अशी लेखकाची धारणा आहे. तीच परंपरा बाजीप्रभूंनी राखली आणि म्हणूनच त्यांनी सांडलेल्या रक्ताचं, मातृभूमीच्या रक्षणासाठी केलेल्या त्यागाचं पुढच्या पिढ्यांसाठी मार्गदर्शक व्हावं या हेतूने 'महारूद्र बाजीप्रभू' हा कादंबरीरूप इतिहास लिहिण्याचा लेखकाचा प्रयत्न होता आणि त्यांनी तो पूर्ण केला. अरविंद दाढे यांनी इतिहासाशी प्रामाणिक राहूनच लेखन केले आहे.

ऐतिहासिक कादंबऱ्यांच्या निर्मितीमागे थोर नेत्यांनी, पराक्रमी राजांनी जे कार्य केले ते कार्य, शौर्य, निष्ठा, देशभक्ती, पराक्रम इत्यादी इतिहास वाचकांना सांगून वाचकांमध्ये वीररस उत्पन्न करून देशाभिमान निर्माण करणे हा उद्देश असतो. त्याचप्रमाणे शिवाजीराजे, बाजीप्रभू, त्यांचे मावळे, जिजामाता यांसारख्या थोर व्यक्तींनी जे कार्य केले ते इतरांना कळावे व त्यांनाही तसे कार्य करण्याची प्रेरणा मिळावी हा देखील उद्देश असतो.

बाजीप्रभूंनी देशासाठी, राजासाठी प्राणांचे बलिदान देऊन आपल्यासमोर जो आदर्श ठेवला आहे, जी भावना निर्माण केली आहे, तशी देशासाठी सर्वस्व समर्पणाची भावना प्रत्येक भारतीयाच्या मनामध्ये निर्माण व्हावी. आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी, देशरक्षणासाठी, मातृभूमीच्या रक्षणासाठी आजपर्यंत अनेकांनी आपले प्राण गमावले. त्यांच्याप्रमाणे तळहातावर शिर घेऊन लढणारी पिढी निर्माण होण्याची आज खरी गरज आहे. ऐतिहासिक काळातील थोर विभूतींनी पराक्रमाचा, शौर्याचा जो आदर्श घालून दिला त्या आदर्शाला वाचकांपर्यंत पोहचविणे, त्यांच्या मनात यशश्री वीरश्री निर्माण करणे, शिवकालीन इतिहासाचे लोकांना ज्ञान करून देणे. आदर्शराजा, आदर्शयोद्धा यांची वर्णने वाचून तरूणांचे रक्त सळसळले पाहिजे व देशाच्या रक्षणासाठी त्यांनी प्राणपणाने लढले पाहिजे हाही यामागचा महत्त्वाचा उद्देश म्हणावा लागेल. आजच्या परिस्थितीत भारतमातेचे रक्षण करणे, आपले स्वातंत्र्य टिकविणे हेच सर्वांचे एकमेव ध्येय असायला हवे. तरूणांमध्ये जोश, सामर्थ्य, देशभक्ती, राष्ट्र संरक्षण इत्यादी भावना निर्माण व्हावी हे या ऐतिहासिक कादंबऱ्यांचे उद्देश आहेत.

### ४) शीर्षक :-

आपण कोणतीही कादंबरी वाचावयास घेतली की, सर्वात आधी तिचे नाव वाचतो. कादंबरीच्या नावावरून कादंबरीमध्ये काय आहे याचा अंदाज आपणाला येतो. तशाचप्रकारे 'पावनखिंड' या कादंबरीच्या नावावरून आपल्या डोळ्यांसमोर बाजीप्रभूंनी गजापूरच्या खिंडीमध्ये केलेल्या लढाईचा प्रसंग उभा राहतो. गजापूरच्या खिंडीला पूर्वी 'घोडखिंड' या

नावाने ओळखत. परंतु बाजींनी ती खिंड लढवून आपल्या रक्ताने ती पावन केली. त्यामुळेच या खिंडीला 'पावनखिंड' हे नाव पडले.

रणजित देसाई यांनी कादंबरीमध्ये बाजीप्रभू स्वामीनिष्ठेने प्रेरित होऊन गजापूरची खिंड लढवतात व हसत हसत मृत्यूला जवळ करतात. हा बाजीप्रभूंच्या जीवनातील अतिशय महत्त्वपूर्ण प्रसंग रेखाटला आहे. बाजीप्रभूंची गजापूरच्या खिंडीतील लढाई ही रोमांचकारी व चित्तथरारक होती. त्यामुळेच रणजित देसाईंनी आपल्या कादंबरीला 'पावनखिंड' हे नाव दिले.

अरविंद दाढे यांना बाजीप्रभूंविषयी विलक्षण आकर्षण वाटत होते. त्याचप्रमाणे भालजी पेंढारकर यांचा 'छत्रपती शिवाजी' ह्या चित्रपटामध्ये प्रचंड पराक्रमी व्यक्तिमत्त्वाचे बाजीप्रभू खिंडीत लढत असतानाचा दाखविलेला भाग अतिशय चित्तथरारक व वेधक आहे. हा चित्रपट पाहत असताना त्यातील बाजीप्रभूंचे व्यक्तिमत्त्व हे लेखकाला रूद्राच्या अवताराप्रमाणे वाटले. रूद्राचे तांडव प्रसिद्ध आहे. संतापलेला रूद्र तांडवनृत्य करतो आणि शत्रूचा विनाश करतो. बाजीप्रभूदेखील रूद्राप्रमाणे क्रोधित होऊन मुगल सैन्यावर तुटून पडले. त्यांचा तो लढण्याचा आवेश, शौर्य पाहून लेखकाला 'महारूद्र' हेच नाव बाजीप्रभूंना द्यावे वाटले असेल असे वाटते. त्याचप्रमाणे पन्हाळगडावर बालेकिल्ल्यामध्ये बिनखांबी महादेवाचे एक मंदिर आहे. सिद्दी पन्हाळगडाला बरेच दिवस वेढा देऊन बसला होता. त्यामुळे राजांना पन्हाळगडावरून सुटून जाण्याचा कोणताच मार्ग दिसत नव्हता. तेव्हा राजे बाजींसह ह्या मंदिरामध्ये दर्शनाला जातात आणि मनोभावे पिंडीला हात जोडून प्रार्थना करतात. त्यावेळी बाजी राजांच्या पाठीशी उभे होते. राजांना तो रंग बदलणारा महादेव खुणावत असावा असे लेखकाला वाटले आणि तसाच विचार लेखकाच्या मनात आला. त्यामुळेच 'बाजीप्रभू देशपांडे' या सबंध व्यक्तिरेखेवर आधारलेल्या कादंबरीला 'महारूद्र बाजीप्रभू' हे नाव दिले.

'महारूद्र' म्हणजे शंकराचा अवतार. बाजींनी गजापूरच्या खिंडीत जो पराक्रम केला तो रूद्राप्रमाणेच होता. जटाधारी शंकर ज्यावेळी मनाविरूद्ध एखादी गोष्ट होते त्यावेळी तांडव नृत्य करून तिन्ही लोक दोलायमान करतो. त्याप्रमाणेच बाजींनी शत्रूसैन्यात तांडव करून रूद्रावताराने शत्रूचा विनाश घडवून आणला. त्यामुळेच लेखकाने आपल्या कादंबरीला 'महारूद्र बाजीप्रभू' हे नाव दिले.

ज्यावेळी आपण एखाद्या कादंबरीचे नाव वाचतो त्यावेळी जर आपल्याला ते शीर्षक आवडले तर कादंबरीमध्ये काय आहे याची आपण कल्पना करतो. त्याचप्रमाणे त्याच्या नावावरून आपल्या मनामध्ये एकप्रकारचे आकर्षण व उत्कंठा निर्माण होते. 'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या दोन्ही कादंबऱ्यांचे शीर्षकही अशाचप्रकारचे आहे. बाजीप्रभूंनी स्वामीनिष्ठेसाठी व देशनिष्ठेसाठी प्राणांचे बलिदान देऊन जे कार्य केले ते अतुलनीय आहे. 'पावनखिंड' या कादंबरीमध्ये बाजीप्रभूंच्या उत्तरार्धाचा भाग येतो तर 'महारूद्र बाजीप्रभू' या कादंबरीमध्ये त्याच्या संपूर्ण जीवन चरित्राचा भाग येतो.

अशारीतीने 'पावनखिंड' आणि 'महारूद्र बाजीप्रभू' या दोन्ही कादंबऱ्यांची शीर्षके कादंबरीला अनुरूप अशीच आहेत. ही आशयाशी जुळणारी आहे.त्याचप्रमाणे दोन्ही कादंबऱ्यांची मुखपृष्ठे वीररस उत्पन्न करणारी आहेत.

# संदर्भ सूची


१) बापट वसंत - तौलनिक साहित्य अभ्यास पद्धती, मौज प्रकाशन मुंबई, पृ.क्र. १६.

२) एडमंड गॉस, उद्धृत रा.शं. वाळिंबे - वाङ्मयीन टीका, जनार्दन सदाशिव लि. पुणे, १९४६, पृ.क्र. ८२.

३) रॉबर्टसन-उद्धृत रा.शं. वाळिंबे, तत्रैव, पृ.क्र. ८२.

४) बापट वसंत- तौलनिक साहित्याभ्यास : मूलतत्त्वे आणि दिशा, श्री. पु. भागवत - यदुनाथ थत्ते, मौज प्रकाशन, गृह-आंतरभारती, मौज मुंबई - पुणे - १९८१, पृ.क्र. १.

५) चिपळूणकर वि.कृ.-निबंधमाला पृ.क्र. १३५.

६) मुजुमदार गो.गो. - मराठीची सजावट भाग २ रा, पृ.क्र. ३८.

७) आळतेकर म.मा.-मराठी निबंध, प्रथमावृत्ती, सुविचार प्रकाशन मंडळ, पुणे, १९६३ पृ.क्र. ५९.

८) लेले वामन केशव-ललित लेखन व शैली, प्रथमावृत्ती, साहित्यप्रचार केंद्र, नागपूर, १९८४ पृ.क्र ३०.

९) दाढे अरविंद-महारूद्र बाजीप्रभू, अक्षयविद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, २२ जानेवारी २००७, पृ.क्र. २४१, २४२.

१०) तत्रैव, पृ.क्र. २६६.

११) देसाई रणजित-पावनखिंड, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, पुनर्मुद्रण मार्च २००७, पृ.क्र. १५३.

१२) दाढे अरविंद-महारूद्र बाजीप्रभू, उनि, पृ.क्र. २४२.

१३) डॉ. शिवदे सदाशिव-जिद्द चेतवणारी बाजीप्रभूंची कहाणी, दैनिक सकाळ सप्तरंग पुरवणी, ९ सप्टेंबर २००७, पृ.क्र. ७.

१४) तोडमल - पटारे वर्षा - स्वामीजींच्या साहित्यातील प्रकाशधारा, मनशक्ती, दिवाळी विशेषांक - २००८, वर्ष २७, अंक ८, पृ.क्र. १३.

१५) मोरे सदानंद - राष्ट्रीय भावनेचं मराठीपण, ग्राहकहित दीपावली विशेषांक, नोव्हेंबर २००८, पृ.क्र. २७४.

१६) जाधव रमेश - लोकराजा छत्रपती शाहू, सुरेश एजन्सी प्रकाशन, दुसरी आवृत्ती, जून २००२, पृ.क्र. १७४.

१७) तत्रैव, पृ.क्र. १८१.

१८) टण्णू रंगनाथ वामन - पवित्र जीवन, प्रथमावृत्ती, १५ डिसेंबर १९८६, पृ.क्र. १२३.

१९) स्वामी व्ही.एन. - महाराष्ट्रातील समाजसुधारक, संत, साहित्यिक आणि थोर भारतीय विचारवंत, विद्याभारती प्रकाशन, आवृत्ती २००७, पृ.क्र. १४.

२०) तत्रैव, पृ.क्र. २४.

२१) दाढे अरविंद-महारूद्र बाजीप्रभू, उनि पृ.क्र. ११२.

२२) देसाई रणजित-पावनखिंड, उनि पृ.क्र. १४०.

२३) दाढे अरविंद-महारूद्र बाजीप्रभू, उनि, पृ.क्र. २८६.